# बिबट्यांचा उपद्रव : पर्याय काय?

**भारतात दर वर्षी पिसाळलेली कुत्री चावल्यामुळे जितकी माणसं मरतात, त्यापेक्षा कमी माणसं गेल्या दहा वर्षांत बिबट्यामुळे मृत्युमुखी पडली आहेत. तरीदेखील आपण बिबट्यालाच का घाबरतो? कारण तो आकारानं मोठा असतो. मानवी वस्तीत तो एवढा धुमाकूळ घालतो, तर जंगलात राहणारी माणसं किती धोक्यात राहत असतील! अजिबात नाही. जंगलात राहणारे आदिवासी, ठाकर हे निसर्गाशी एकतानता साधलेले असतात. त्यांचे छोटे छोटे पाडे अगदी स्वच्छ असतात. ते त्यांच्या पाळीव प्राण्यांना अगदी सुरक्षित ठेवतात आणि मुख्य म्हणजे बिबट्या किंवा अन्य वन्य प्राणी समोर आल्यास त्याला ते डिवचत नाहीत.**

**विद्या अत्रेय**, संशोधन सहायक, काटी ट्रस्ट



आपला परिसर आरशासारखा लख्ख ठेवा; त्यामुळे कुत्र्यांची आणि डुकरांची संख्या रोडावेल आणि पर्यायाने बिबट्याही तुमच्या वाडी-वस्तीवर फिरकणार नाही !

गेल्या आठवड्यात नगर जिल्ह्यातील अकोले येथे बिबट्यानं धुमाकूळ घातला. काही दिवसांपूर्वी नाशिकमध्येही बिबट्या आला. त्याआधी दुसऱ्या कोणत्या तरी गावात तो आला होता. बिबट्या आणि माणूस असा संघर्षच उभा राहिल्याचं चित्र आता दिसतं आहे; पण हे खरंच तसं आहे का? बिबट्या हा आपला खरंच शत्रू आहे का? की नेहमी सांगण्यात येतं, त्याप्रमाणे जंगलाचं क्षेत्र कमी झाल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे?

प्रश्न बरेच आहेत आणि त्यांची उत्तरं जाणून घ्यायची असतील, तर सगळ्यात आधी ही फार मोठी समस्या असल्याचा समज दूर करायला हवा. बिबट्या मानवी वस्तीत का येतो हे समजून घ्यायला हवं.

मुळात भारतात मनुष्य आणि पाळीव प्राण्यांची घनता जगात सर्वाधिक आहे. जंगली प्राणी, पाळीव प्राणी आणि मानव हे एकाच क्षेत्रात मोठ्या संख्येनं राहतात, हीच मूळ समस्या आहे. कुत्री, शेळ्या-मेंढ्या, डुकरं, कोंबड्या हे आपले मित्र प्राणी आहेत, असं आपण मानतो आणि बिबट्या त्यांना खाद्य मानतो. त्यातल्या त्यात कुत्रा हा प्राणी त्याचं आवडतं खाद्य आहे. खरंच, बिबट्याला कुत्री आवडतात. गुजरातमधलंच एक उदाहरण घेऊ या. तिथं एका उसाच्या शेतात बिबट्या होता. शास्त्रज्ञांनी त्या बिबट्यावर लक्ष ठेवण्यासाठी त्याला 'रेडिओ कॉलर' बसवली होती. त्यातून असं दिसलं, की तो बिबट्या काहीतरी मोडल्याच्या आवाजानं त्या दिशेला धावला. तिथं त्याला कुत्रा दिसला. मग तो त्या कुत्र्याच्या पाठलागावर अर्धा किलोमीटर धावला. शेवटी त्यानं कुत्र्याला पकडलं आणि मटकावलं. नशिबानं महाराष्ट्रात या बिबट्यांच्या दुप्पट आकाराचे सिंह नाहीत. गुजरातच्या जुनागड भागात तेही आहेत. तेदेखील उसाच्या शेतांमध्ये राहतात आणि पाळीव प्राण्यांवर आपली गुजराण करतात.

### हे आताच झालं का?

नाही. अगदी शंभर वर्षांपूर्वीच्या नोंदी पाहिल्या तरी बिबट्या पाळीव प्राणी पळवत असल्याचं दिसून येतं. त्यासाठीच तो मानवाजवळ येतो. त्यातच गावांच्या जवळ असणाऱ्या बागायती, उसाची शेतं यात तो सहजतेनं लपून जाऊ शकतो.

### बिबट्याला जंगलात सोडायचं का?

आपल्या शेतात असा एखादा बिबट्या दिसला, की आपण काय करतो? त्याला पिंजऱ्यात अडकवतो आणि दूर जंगलात नेऊन सोडतो. हा पर्याय अतिशय घातक आहे, असं महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये झालेल्या संशोधनातून दिसून आलं; कारण त्या बिबट्याला उसाच्या शेतात राहून कुत्री, डुकरं आणि शेळ्या-मेंढ्या खाण्याची सवय लागलेली असते. अचानकच जंगलात आल्यावर त्याला निराधार झाल्यासारखं वाटतं. जंगलात तुलनेनं अन्नही कमी असतं. मग तो चवताळतो, वैतागतो, चिडतो. त्यातूनच मग मानवावर हल्ले होण्याची शक्यता वाढते.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे मार्जार वंशाचे प्राणी आहेत. ज्या प्रकारे दूरवर नेऊन सोडलेलं मांजर पुन्हा घरी परततं, तसंच हे प्राणीही आपल्या 'घरी' परततात. या प्राण्यांनी 'घरी' येण्यासाठी १०० किलोमीटरचं अंतरही पार केल्याची उदाहरणं महाराष्ट्रात आहेत. आफ्रिकेत याबाबत एक प्रयोग करण्यात आला होता. संशोधकांनी दोन बिबट्यांना चांगलं दूरवर, सुमारे ४०० किलोमीटरवर नेऊन सोडलं. त्यांना 'रेडिओ कॉलर' बसवली होती, तर हे बिबटे पुन्हा आपल्या घरी परतले. त्यांना ते अंतर कापायला वर्ष लागलं; पण ते परतलेच! जरा विचार करा... हरवलेला, भुकेलेला, खूप ताण आलेला आणि आपलं घर शोधण्याचा प्रयत्न करत असलेला अनोळखी भागातून हिंडणारा हिंस्र प्राणी किती धोकादायक असू शकेल? जुन्नर तालुक्यातल्या बोरी बुद्रुक या गावी उसाच्या शेतात दोन बछडे सापडले होते. त्यांची आई तिथंच आसपास असणार, हे जाणून बछड्यांना पिंजऱ्यात ठेवून तिच्यासाठी सापळा लावण्यात आला. थोड्या वेळात ती आईदेखील सापळ्यात अडकली. मग त्या तीन बछड्यांना आणि त्यांच्या आईला 'मायक्रो चिप' लावून भीमाशंकरच्या जंगलात सोडण्यात आलं. या घटनेला साधारण दोन वर्षं उलटली असतील-नसतील, तर तिथंच एक मादी आपल्या बछड्यांसह सापडली. त्यांची तपासणी करताना त्या आईच्या शरीरात 'मायक्रो चिप' सापडली. त्यावरून हे लक्षात आलं, की दोन वर्षांपूर्वी भीमाशंकरच्या जंगलात सोडलेल्या बछड्यांपैकी ती एक आहे. याचाच अर्थ ती आई 'बाळंतपणा'साठी आपल्या 'घरी' आली होती. चक्क ७० किलोमीटरचं अंतर कापून! आता अशा वेळी करायचं तरी काय?

### मोठा धोका

बिबट्यांना जंगलात नेऊन सोडण्यात आणखी एक मोठा धोका आहे. अशा प्रकारे त्यांचं स्थलांतर करून कदाचित त्यांची गावाजवळची संख्या वाढू शकते! उसाच्या शेतांमध्ये असलेले बिबटे किती तरी वेळा दूरवर नेऊन सोडले, तरी त्यांची संख्या कमी होताना दिसतच नाही; कारण बिबटे खूप दूरची अंतरं पार करून परत येतात. महाराष्ट्रातच पकडलेल्या एका बिबट्यानं फक्त वीस दिवसांत १२० किलोमीटर अंतर पार केलं होतं. त्यातही विचार करण्यासारखी एक गोष्ट आहे. मोठे बिबटे हे त्यांच्या भागात येणाऱ्या लहान किंवा तरुण बिबट्यांना पळवून लावतात किंवा ठार करतात. आपण जेव्हा मोठ्या बिबट्यांना पकडून दूर सोडतो, तेव्हा तो भाग या तरुण बिबट्यांसाठी मोकळा होतो. एका मोठ्या बिबट्याच्या जागी दोन तरुण बिबट्यांना जागा निर्माण करून देतो. हेच जास्त धोकादायक आहे; कारण हे तरुण बिबटे अननुभवी असतात आणि तरुण मुलांप्रमाणेच त्यांचंही रक्त उसळतं असतं. एकतर त्यांना तो भाग परिचयाचा नसतो आणि तारुण्याच्या ऊर्मीत ते धोका पत्करू शकतात, वाटेत आडवं येणाऱ्यांवर हल्लाही करू शकतात. साधा विचार करा. एखाद्या गावात जाणती माणसं नसतील, फक्त तरुणच असतील, तर काय होईल? ते दिशाहीन होतील. तेच या बिबट्यांबाबत घडतं.

### मग करायचं तरी काय?

आपल्याला हा प्रश्न पडणं साहजिकच आहे. खरंतर बऱ्याच ठिकाणी आपल्याला शेतात बिबट्या आहे, हे समजतही नाही. मुळात बिबट्या गावाजवळ किंवा गावात येतो, तो पाळीव प्राण्यांमुळे हे लक्षात घ्यायला हवं. तो माणसावर सहसा हल्ला करत नाही. अंगावर धावून येतो किंवा ओरडतो, ते मानवानं घाबरून मागं जावं, यासाठी. बिबट्या गावात किंवा घरात येऊ नये, यासाठी या पाच गोष्टी करता येतील :

१. आपलं गाव आणि गावाचा परिसर आरशासारखा लख्ख ठेवा. त्यामुळे कुत्र्यांची आणि डुकरांची संख्या रोडावेल आणि पर्यायानं बिबट्या गावाकडे फिरकणार नाही. या समस्येवरचा हा खरोखरच उत्तम पर्याय आहे.
२. लहान मुलांना अंधारात बाहेर सोडू नये. (हे गावाप्रमाणे शहरांसाठीही लागू आहे. तिथं बिबट्याची भीती असते, तर इथं वाईट वृत्तीची माणसं आणि वाहनांची!)
३. पाळीव प्राण्यांची सुरक्षा व्यवस्था भक्कम करा.
४. पकडलेल्या बिबट्यांबद्दलचं धोरण आणि कायदा बदलायला हवा. त्यांना दूरवर नेऊन सोडण्यापेक्षा त्याच भागात; पण मानवाला त्रास होणार नाही, असं ठेवणं जास्त योग्य ठरेल.

शेवटी बिबट्या हा निसर्गचक्रातला एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे त्याचा धसका घेण्याऐवजी त्याचं विरळ मानवी वस्ती असलेल्या ठिकाणी किंवा जगलांमध्ये जतन आणि संवर्धन करायला हवं. उसाच्या फडांमध्ये मोठ्या संख्येनं राहणाऱ्या बिबट्यांची संख्याही आटोक्यात आणायला हवी. त्यासाठी सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे, गावं आणि परिसर स्वच्छ ठेवण्यांचा आणि भटक्या जनावरांच्या संख्येवर आळा घालण्याचा. बहुतांश समस्यांप्रमाणे या समस्येवरही रामबाण उपाय नाही, हेही लक्षात घ्यायला हवं. त्यासाठी सर्वसामान्य नागरिक आणि प्रशासन अशा दोन्ही पातळ्यांवर विचारविनिमय होणंही महत्त्वाचं आहे.

## बिबट्या आणि शेत

सध्या आम्ही महाराष्ट्रातील बिबट्यांवर संशोधन करत आहोत. बंगळूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेच्या सहकार्यानं हे संशोधन सुरू आहे. त्यातील ही काही निरीक्षणं :

१. महाराष्ट्रातील उसाच्या फडात मोठ्या प्रमाणावर बिबटे आहेत. त्यांचा जन्म, मृत्यू सारं काही उसाच्या फडातच होतं. त्यांचं मुख्य अन्न कुत्रा हा प्राणीच आहे. त्याखेरीज डुकरं आणि शेळ्याही ते खातात.
२. बहुतेक बिबटे मानवाला कोणताही उपद्रव न देता शांतपणे राहतात; किंबहुना बऱ्याचदा त्यांच्या अस्तित्वाची चाहूलही लागत नाही. अर्थात काही वेळा अपघात घडतातच; पण अपघातानं झालेला किंवा फक्त घाबरविण्यासाठी केलेला हल्ला आणि मारून टाकण्यासाठी केलेला हल्ला यात फरक आहे.
३. पाळीव मांजरांप्रमाणेच बिबटेही पुन्हा आपल्या 'घरी' परततात.

## काही पर्याय

आमच्या आजवरच्या संशोधनातून बिबट्याच्या प्रश्नावर परिणामकारक ठरू शकणारे काही पर्याय :

१. धोरणकर्त्या ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्यानं गाव आणि आसपासचा परिसर स्वच्छ ठेवल्यास कुत्री आणि डुकरांचा आणि त्यामुळे बिबट्यांचा उपद्रव कमी होईल. हळूहळू बिबट्याचं मानवी वस्तीजवळ येणंही कमी होत जाईल.
२. पकडलेल्या प्राण्यांबाबतचं धोरणही बदलायला हवं. त्यांना दूरवर सोडून देणं अधिक धोकादायक ठरू शकतं. घरापासून दूर गेलेले, अगदी अनोळखी भागात सोडलेले हे प्राणी गांगरतात, नंतर चिडतात आणि त्या चिडीतूनच मानवावर हल्ले सुरू होतात. त्यामुळे आजपर्यंत केवळ पाळीव प्राणी खाणारे हे प्राणी नरभक्षक होण्याचा धोका वाढतो.
३. बिबट्यांना पकडतानाही काळजी घ्यायला हवी. या वेळी घडणाऱ्या घटनांमुळेही बिबटे चवताळतात. समजा एखाद्या शेतातून मादी पकडली, तर तिचे बछडे आहेत का, याचाही शोध घ्यायला हवा. तसं न घडल्यास ते आईपासून वेगळे केले गेलेले बछडे चवताळतात आणि आपल्यापुढे पुन्हा मोठा प्रश्न उभा करतात.
४. मानवी वस्तीजवळून पकडलेल्या बिबट्यांच्या स्वभावाचा विचार करून मगच त्याबाबत काय करायचं याबाबतचं धोरण ठरवायला हवं.